16 5.1 2018 5

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

*A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles*

## Goal

Our Goal is to provide the best and updated knowledge in the field of research and education to all the Researchers, Professionals and Students.

## Aims and Objectives

- To reach the unreached areas in research
- To publish innovative research papers/articles
- To provide a rapid turn-around time possible for reviewing and publishing.
- To provide quality research articles to the people who are interested in Research and Research Guidance.

**Note :**

- *The authors will be responsible for contents in the paper.*
- *The Papers should paper should be original, Content in the paper should not be copied from any other journal or internet sources*
- *The Publisher & Editors are not responsible for* ***plagiarism.***

1

502

(6)




| | | | |
|---|---|---|---|
| 38 | ग्रंथालय संगणकीकरण | [1]कारभारी गोविदराव मगर<br>[2]संतोष शेषराव देशमुख | 160-162 |
| 39 | ग्रंथालय संगणकीकरण | [1]डॉ. पांचाळ जी.एन.<br>[2]जाधव मारोती बालाजी | 163-164 |
| 40 | ज्ञानव्यवस्थापनाचे महत्त्व | [1]शरद अ.कादबाने<br>[2]अतुल आर. चंदनवंदन | 165-167 |
| 41 | ज्ञान व्यवस्थापन | प्रा.कोरे वाय.बी. | 168-173 |
| 42 | नेटवर्कींग द्वारा ग्रंथालय संसाधन सहभागीता | [1]डॉ. विलास के. भिमनवार<br>[2]सौ.गायत्री चं.महत्वाने | 174-177 |
| 43 | माहिती व्यवस्थापन | कुमारी प्रतिक्षा विकास गुळस्कर | 178-181 |
| 44 | ग्रंथालय संगणकीकरण: परिवर्तनाचा पाया | [1]डॉ. कुलकर्णी जगदीश नरहरराव<br>[2]धोंगडे रवि देवराव | 182-185 |
| 45 | ABCD आज्ञावली एक अभ्यास | [1]डॉ. राहुल के. देशमुख<br>[2]श्री. गजानन पी. खिस्ते | 186-189 |
| 46 | ग्रंथालयाचे संगणकीकरण काळाची गरज | [1]प्रा.डॉ.आर.पी.आडाव<br>[2]श्री. सरदार निवृत्ती पाटील | 190-195 |
| 47 | ग्रंथालय वाचनसाहित्य सुरक्षितता | [1]गजानन प्रल्हादराव खिस्ते<br>[2]योगेश प्रकाश सुरवाडे | 196-198 |
| 48 | एकविसाव्या शतकात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाव्दारे ग्रंथालयातील बदलत्या आधुनिक सेवा | प्रा. मंगेश वामनराव वागदे | 199-201 |
| 49 | बौध्द धर्म की सुचनाओ का उत्तम स्त्रोत : बौध्द ई-लाईब्रेरी | डॉ. विकास बोरकर | 202-204 |
| 50 | 21व्या शतकातील ग्रंथालय व्यवस्थापन आणि ज्ञान व्यवस्थापन | ज्ञानेश्वर शंकरराव हिलाले | 205-208 |
| 51 | ग्रंथालय संगणकीकरणाची आवश्यकता आणि गरज | प्रा. विठ्ठल जाधव | 209-211 |
| 52 | ऑर्गनायझेशन ऑफ डिजिटल मटेरियल | प्रा. संजय क्षीरसागर | 212-215 |
| 53 | नेटवर्कींगमध्ये ग्रंथालयीन साहित्यांची देवाण घेवाण | श्री.दत्तात्रय शामराव पाटील | 216-220 |
| 54 | Library Automation | Harpude Surekha Sunil | 221-224 |
| 55 | Knowledge Management in Academic Libraries | Mrs. Sarika V. Patil | 225-227 |
| 56 | Status of use of ICT and its impact on Academic libraries in Ratnagiri District | Shivaji Pandurang Patil | 228-233 |

503

VOLUME-V (I) * Special Issue: January 2018 ISSN (Print): 2394-207X
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# ग्रंथालय संगणकीकरणाची आवश्यकता आणि गरज

**प्रा. विठ्ठल जाधव**
ग्रंथपाल
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

**प्रस्ताविक :** माहिती निर्माण करण्याचा धडाका तसेच आजच्या वाचकांच्या माहितीबाबतच्या मागण्या लक्षात घेता ग्रंथालयाच्या दैनंदिन कामकाजात संगणकाचे महत्त्व पटते. ग्रंथालय संगणकीकरण करतात ती माणसे तंत्रज्ञान मिळाले म्हणजे कार्य होतेच असे नाही. कार्य उभे राहते ते प्रथम मनात, चिंतनात त्याचा विकास होतो आणि नंतर आकार येतो तो जिद्दीचा. ही जिद्दच अवघड कार्य करून जाते आणि मग त्यातून प्रत्यक्ष रूप साकारले जाते ते यशस्वी संपूर्ण संगणकीकृत ग्रंथालय.

**संगणकीकरणाची गरज :** प्राचीन काळात ग्रंथालयातील ग्रंथ कपाटात बंद करून ठेवले जात असे. ग्रंथ वाचकांपर्यंत पोहोचविण्यापेक्षा ते जपून कसे ठेवता येतील याकडे त्याकाळातील ग्रंथपाल कटाक्षाने लक्ष ठेवायचे. ग्रंथालयाच्या या वृत्तीला कारणेही तसीच होती. मुद्रण कला विकसीत झालेली नव्हती. त्यामुळे एका ग्रंथाच्या अनेक प्रती तयार होवू शकत नव्हत्या. पुढे मुद्रण कला विकसीत झाल्यामुळे ग्रंथाच्या प्रती वाढू लागल्या व वाचकांना आवश्यक असलेले ग्रंथ अभ्यासण्यास मिळू लागले. ग्रंथाच्या संख्येत वाढ झाल्यामुळे साहजिकच ग्रंथालय व्यवस्थापनात देखील बदल घडून आलेले आढळून आले. आज २१ व्या शतकाच्या उंबरठयावर प्रचंड माहिती ग्रंथाच्या तसेच कॅसेट, सी.डी. रोम, मायक्रोफिल्म, मायक्रोफिश (Micro Fitch) डिजिटल व इंटरनेट च्या माध्यमातून निरनिराळया स्वरूपात वाचकांसमोर येत आहे.

ही सर्व माहिती एकत्रीत करणे तीचे सुयोग्य व्यवस्थापन करून ती संबंधीत वाचकांना पुरविणे अशी अवघड कामे ग्रंथालयांना करावी लागत आहेत. केवळ मनुष्य बळाचा वापर करून ही कामे व्यवस्थीतपणे पार पाडणे जवळ जवळ अशक्यच आहे. यावर उपाय म्हणून आज बहुतेक ग्रंथालयात संगणकाचा वापर होत आहे. ज्या ग्रंथालयात संगणकाचा वापर अजून पर्यंत झालेला नाही ती ग्रंथालये त्या दृष्टीने विचार करताना दिसून येत आहेत. ग्रंथालयाच्या या बदलत्या दृष्टीकोनाचा ग्रंथालय व्यवस्थापनेचा तसेच आजच्या परिस्थितीचा विचार केल्यास खालील घटक ग्रंथालय संगणकीकरणास चालना देण्यास कारणीभूत असल्याचे दिसून येते.

१. काळाची गरज
२. माहितीचा विस्फोट
३. जागेची कमतरता
४. वेळेची बचत
५. तत्पर सेवा
६. पुरेशा निधीचा अभाव

**१.काळाची गरज:**आज जवळपास सर्व क्षेत्रात संगणकाने प्रवेश मिळविलेला आहे. मनुष्याचा दैनंदिन जीवनात देखील संगणकाचा वापर होत आहे. मोबाईल शिवाय एक दिवसही तरूण पिढी राहू शकत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक असे कोणतेही क्षेत्र असो त्यामध्ये संगणकाचा वापर ही अत्यावश्यक बाब बनली आहे. ग्रंथालयाचे कार्य, पध्दती याचा अवाढव्य पसारा वाचकांच्या मागण्या, माहिती निर्माण होण्याचा वेग या सर्व घटकांचा विचार करताना, ग्रंथालयात देखील संगणकाचा उपयोग करून घेणे ही काळाची गरज झालेली आहे.

**२. माहितीचा विस्फोट :** ग्रंथालय म्हटले की त्यात वाचकांना आवश्यक असणाऱ्या सर्वच ग्रंथाचा संग्रह असला पाहिजे. वाचक मागत असलेली सर्वच माहिती ग्रंथालयाने पुरवावी अशी अपेक्षा ग्रंथालयाकडून केली जाते. ग्रंथालयाची कल्पना याच करिता मांडण्यात आलेली असल्यामुळे समाजाने ग्रंथालयाकडून अशी अपेक्षा करणे यात गैर असे काही नाही. सुरुवातीस माहिती निर्माण होण्याचा वेग कमी असल्यामुळे ग्रंथ कमी प्रमाणात प्रकाशित होत असत.

दुसऱ्या महायुध्दानंतर माहितीचा विस्फोट झाला निरनिराळया क्षेत्रात संशोधन प्रक्रिया वाढीस लागली प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध होवू लागली ती माहिती संग्रहीत करून वाचकांना पुरविण्याचे कार्य ग्रंथालयाच्या प्रचलित पध्दतीनुसार पार पाडणे अशक्य होवू लागले. स्वत:च्या विषयासंबंधी किती ग्रंथ प्रकाशित आहेत. हे त्या विषयाचा गाढा अभ्यासक

504

(8)



सुध्दा सांगू शकत नाही. तेव्हा ती माहिती मिळविणे हे तर दूरच राहिले ग्रंथालयाची ही समस्या संगणकाने सोडविलेली आहे. इंटरनेटमुळे आज आपण बसल्या जागी हवी ती माहिती कमी खर्चात प्राप्त करू शकतो. माहितीच्या महासागरातून नेमकी माहिती पुरविण्याकरीता संगणकाचा वापर आज अपरिहार्य ठरत आहे.

**३.जागेची कमतरता :**माहितीच्या विस्फोटामुळे ग्रंथांची नियतकालिकांची प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. दरवर्षी त्यात भर पडतच आहे. या वाढीच्या प्रमाणात ग्रंथालयाच्या जागेत मात्र वाढ होत नाही त्यामुळे डिजीटल लायब्ररी ही संकल्पना आता वेगाने पुढे येत आहे.तसेच Electronic Book या नावाने हे तंत्र विकसीत होत असून अनेक प्रकाशक Electronic पध्दतीने पुस्तक व नियतकालिके प्रकाशित करीत आहेत. N-List च्या माध्यमातून ३१३५००० eBooks तर ६००० नियतकालिके उपलब्ध आहेत. शिवाय MHRD विभागामार्फत नॅशनल डिजीटल लायब्ररी वर ही वाचकांचा भरभरुन प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे वाचकांना पाहिजे असलेली माहिती त्याचा वेळ वाया न जाता उपलब्ध होत आहे.

**४. वेळेची बचत :**संगणकाचा वापर करून वाचकांस हवी असलेली माहिती शोधून काढणे सहज शक्य होत आहे. त्यामूळेग्रंथपाल व वाचकांचा वेळ वाचत आहे. हे कर्तव्य पार पाडण्याकरिता प्रत्यक्ष ग्रंथालयास संगणकाची आवश्यकता भासत आहे.

**५. तत्पर सेवा :** माहितीच्या विस्फोटामुळे असंख्या ग्रंथ नियतकालिके यामधून संशोधक, वाचक यांच्या विषयाकरिता आवश्यक माहिती मिळविणे कठीण होत आहे. कोणतेही काम तात्काळ करणे, वारंवार एकच काम करावे लागले तरी न थकता न कंटाळता पूर्ण करणे या संगणकाच्या वैशिष्टयामुळे ही सर्व कामे संगणकाच्या मदतीने व्यवस्थीत पार पाडता येवू शकतात.

**६.पुरेशा निधीचा अभाव :** प्रत्येक ग्रंथालयाकडे असलेल्या मर्यादित निधीमुळे कोणतेही ग्रंथालय जगात प्रकाशित होणारे सर्व वाचन साहित्य वाचकांकरिता खरेदी करू शकत नाही. संगणकाच्या जाळयामुळे वाचन साहित्याची सामुदायीक वापर ही संकल्पना यशस्वी झालेली आहे. त्यामुळे मर्यादित निधीचा अडथळा मोठया प्रमाणावर झालेला आहे.

जगाच्या प्रगतीच्या वेगाच्या तुलनेत, स्पर्धेत आपला देश, समाज, संस्था किंवा व्यक्ती, आपण कुठे मागे तर राहणार नाही ना ? अशी काळजी वाटते. आपणही आधुनिकीरणाची कास धरायला हवी. मागील काही वर्षात महाविद्यालये, विद्यापीठाची ग्रंथालये नॅक (NAAC) अंतर्गत शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन,व त्यानुषंगााने ग्रंथालय संगणीकरणाची गरज प्रखरतेने आज जाणवत आहे.

**ग्रंथालय संगणकीकरण :** ग्रंथालयातील निरनिराळे विभाग व ग्रंथालय सेवा असे ग्रंथालयाचे प्रमुख भाग पडतात या दोन ही भागामध्ये संगणकाचा वापर करता येतो. सध्या बहुतेक ग्रंथालयात तो केला जात आहे. प्रथम भागामध्ये ग्रंथोपार्जन, तालीकीकरण, ग्रंथ देवाण घेवाण, वर्गीकरण, नियतकालिके व्यवस्थापन या विभागाचा समावेश होतो.

ग्रंथालय सेवा या विभागात प्रचलित जागरूकता सेवा (Current Awareness Service) निवडक माहितीचे प्रसारण (Selective Dissemination Information Service) इलेक्ट्रॉनिक सेवा E-Mail इत्यादी ग्रंथालयीन सेवांचा समोवेश होतो. ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथपालास बऱ्याच गोष्टी कराव्या लागतात. मुख्य म्हणजे संगणकाची प्रक्रिया त्याने नीट समजून घेतली पाहिजे. संगणकीकरणासंबंधी लागणाऱ्या सर्व गोष्टींचे ढोबळ ज्ञान ग्रंथपालाने आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यात संगणकीकरणाची गरज, प्रत्येक विभागाच्या कामाचा अभ्यास, त्याचे शास्त्रीय पध्दतीने करावयाचे विश्लेषण, संगणकीकरण करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री व उपलब्ध संगणक प्रणालीची माहिती, त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज इ.गोष्टींचा अंतर्भाव होतो.

**ग्रंथालय संगणकीकरण करण्याच्या आज्ञावली (पध्दती)**सद्यपरिस्थितीत व्यापारी तत्वावर उपलब्ध अशा अनेक आज्ञावली आहेत. ग्रंथपालास आज्ञावलींचे थोडे ज्ञान असल्यास हे काम फार अवघड जात नाही. आपल्या देशात, तसेच परदेशांत अनेक ग्रंथालय संगणकीकरण आज्ञावली (पध्दती) विकसीत झालेल्या आहेत. व नवनवीन विकसीत होत आहेत. अशा आज्ञावलींची यादी तयार करावयाची झाल्यास ती पुढील प्रमाणे होईल :

1. CampSteer
2. Ampletrails
3. NEESA Institute Management System
4. Eshiksa EMP
5. Web Librarian

505 (09)



6. LIBRARIAN
7. Cybrarian
8. LibraryPackage
9. STYLICIOUS - Library Management System
10. Iolite School Management Software
11. LIBSYS7
12. MediSteer
13. SOUL
14. SLIM
15. Academics - Education Management Software

या व अशा अनेक ग्रंथालयीन प्रणाली उपलब्ध आहेत. त्यापैकी कोणतीही एक प्रणालीची निवड करून आपले ग्रंथालय संगणकीकरण करू शकता. उपार्जन (Acpuidiyion), तालिकीकरण (Cataloguing), देवघेव (Circulation), ओपॅक (OPAC), नियतकालिकांचे व्यवस्थापन (Serials Control), व्यवस्थापन (Administration) अशी सर्वच कामे संगणक प्रणाली वापरुन आपण करू शकतो.

निष्कर्ष :आज अनेक ग्रंथालयीन प्रणाली उपलब्ध आहेत. ग्रंथालयाचा दृष्टीकोनही बदलत आहे. NAAC व IQAC यांचाही रेटा आहे. संगणकामध्ये नवनवीन तंत्रज्ञान आले आहे. LAN, WAN इंटरनेट ही महाविद्यालयाची IT Computer Sc- अभ्यासामुळेच नव्हे तर ऑफिस च्या दैनंदिन कामकाजात ही इंटरनेट ची अत्यावश्यक गरज निर्माण झाली आहे. यामुळे तंत्रज्ञानाचे अतिशय जाणकार तज्ज्ञ, प्राध्यापक ग्रंथालयाची मदत करण्यास उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्रंथपालांनी आपली मानसिकता बदलून वेळोवेळी प्रशिक्षण घेवून संपूर्ण ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्याचे काम जोरात व्हायला हवे. अनेक ग्रंथालयामध्ये ते चालू आहे परंतू अनेक ग्रंथालयामध्ये नुसती संगणकावर देवघेव केली जाते आणि संगणकीकरण झाले असे म्हटले जाते. परंतू 'देवघेव करणे म्हणजे संगणकीकरण नसून वरील सर्व सेवा ग्रंथालय प्रणालीच्या माध्यमातून देता येणे हे आजही आवाहन ग्रंथपालांच्या पुढे आहे.

संदर्भ सूची :


१. फडके, द.ना.: ग्रथालय संगणकीकरण आणि आधूनिकिकरण, पुणे: यूनिर्वसल प्रकाशन, २०१५.
२. खेरडे, मोहन: ग्रंथालय संगणकीकरणाची मूलतत्वे, आमरावती: सुयोग प्रकाशन ,१९९९.
३. Lovecy, Ian : Automating Library Procedures.New Delhi:D.K. Ajencies,1984.
४. Faruqi. Khalid k. : Automation in Libraries. New Delhi:Anmol Publication,1997.
5- https://www.softwaresuggest.com/library-management-software